## सार्वजनिक बांधकाम विभाग
## महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद




कार्यकारी अभियंता

मार्ग विकास विभाग क्र. ४, अंधेरी, मुंबई - ४०० ०५८

कार्यकारी अभियंता
मार्ग विकास विभाग क्र.४,
अंधेरी, मुंबई-४०० ०५८
ई मेल rdd4andheri.ee@mahapwd.com

# नागरिकांची सनद
# सन २०१८

## सार्वजनिक बांधकाम विभाग
## महाराष्ट्र शासन

Visit us on www.mahapwd.com
e-mail : rdd4andheri.ee@mahapwd.com

# सुची


| अ.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १ ते २ |
| २. | मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी विभागीय कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी | ३ |
| ३. | कार्यालयाची रचना | ४ |
| ४. | विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र | ४ |
| ५. | मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई या विभागाअंतर्गत कार्यपुर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता | ५ |
| ६. | विभागीय कार्यक्षेत्रातील रस्ते सुरक्षितता | ५ |
| ७. | गा-हाण्याचे निराकरण सनदेचा आढावा जनसामान्यांच्या सुचना | ६ |
| ८. | नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी | ७ |
| ९. | परिशिष्ट "अ", "ब" व "क" | ९ ते १४ |

**प्रस्तावना :-**

मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई हे कार्यालय दिनांक ०१/०७/१९६८ पासून कार्यरत आहे. अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर अंतर्गत सन १९८५ पासून मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई हे कार्यालय कार्यरत आहे. या विभागांतर्गत बुमजली इमारती बांधकाम उप विभाग क्र. ३ कलानगर, बांद्रा, मुंबई रस्ते बांधकाम उप विभाग क्र.१०, अंधेरी, मार्ग विकास उप विभाग क्र.१०, सांताक्रुझ, मार्ग विकास उप विभाग क्र.१२, अंधेरी, ठाणे खाडी पूल उप विभाग क्र.१, कलानगर, बांद्रा असे उप विभाग आहेत.

पश्चिम द्रुतगती मार्ग क्र.६ ची देखभाल व दुरुस्तीचे तसेच सुधारणा इत्यादी कामे करणे, ही कामे या विभागाच्या अखत्यारित येतात. मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी हे कार्यालय कार्यकारी अभियंता, मार्ग विकास विभाग क्र.४, नवीन प्रशासकीय इमारत, ३ रा मजला, भवन्स कॉलेज जवळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०० ०५८ येथे कार्यरत असून हे कार्यालय नागरिकांशी बांधिलकी जपण्यास कटिबध्द आहे. ही बांधिलकी या सनदेव्दारे हे कार्यालय जाहीर करत असून याची जबाबदारी स्विकारीत आहे. हा विभाग पुढे दिलेल्या सुविधा पुरविण्यास बांधिल आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित केलेल्या व पथदर्शित केलेल्या सार्वजनिक सेवा तत्परतेने सौजन्यपूर्वक वागणुकीने उपलब्ध व्हाव्यात व नागरिकांचे सामाजिक प्रश्न सहानुभूतीपूर्वक सोडवावेत हा दृष्टीकोन विचारात घेवून तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी ही सनद तयार करण्यांत आली आहे.

१. हया विभागाच्या कार्यक्षेत्रांतर्गत पश्चिम द्रुतगतीमार्ग क्र.६ ची नियतकालीक देखभाल व दुरूस्ती उपलब्ध निधीतून करणे.

२. हया विभागीय कार्यालयात व अखत्यारितील प्रत्येक कार्यालयात सर्वसामान्य जनतेची गाऱ्हाणी/तक्रारी ऐकणे व त्याचे निवारण करणे.

३. केंद्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत हया विभागाच्या अखत्यारितील मागितलेली माहिती संबधीतांना विहित मुदतीत उपलब्ध करून देणे.

४. कार्यालयाच्या कामकाजात सातत्य ठेवून कार्यपध्दतीत आधुनीकीकरण करणे.

५. संगणकीकरणाबाबत हया विभागाच्या अंतर्गत कार्यालयाना अवगत करणे व प्रादेशिक कार्यालय व मंत्रालय यांना नेटवर्कद्वारे आवश्यक माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी प्रयत्नशील राहणे.

६. हया विभागाअंतर्गत आवश्यक व अद्यावत विहित माहिती तात्काळ सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) उपलब्ध करणे व अद्यावत करणे.

७. कार्यालयामध्ये सर्व अभिलेखे अद्यावत करणे व त्याची वर्गवारी करून अभिलेख कक्ष नोंदवहीसह अद्यावत करणे.

८. नागरिकांच्या सनदेस व्यापक प्रसिध्दी देणे.

## (२) मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी या कार्यालयाची बांधिलकी व नागरिकांची जबाबदारी

### (अ) कार्यालयाची बांधिलकी

वरील सर्व कर्तव्ये पार पाडतांना मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई हे कार्यालय,

अ) सेवेच्या गुणवत्तेची बांधिलकी ठेवील.

ब) सौजन्यपुर्ण व आपुलकीची भावना ठेवून कामाचा वेळेत निपटारा करेल.

क) पारदर्शकता व निष्ठा ठेवील, यासाठी वेळोवेळी विविध प्रमाणपत्र / ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठीची कार्यपध्दती / पत्रके नागरिकांच्या माहितीसाठी उपलब्ध करण्यांत येतील.

### (ब) नागरिकांची जबाबदारी

अ) शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेशी नागरिकांची वर्तणुक सौजन्यपूर्वक असावी.

ब) नागरिकांकडून आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे परिपूर्णरित्या मिळावी.

क) नागरिकांचा प्रतिसाद विकासाला मदत करणारा असावा.

ड) विहित केलेल्या कालावधीपेक्षा कमी कालावधीत सेवा पुरविण्याचा आग्रह धरु नये.

इ) नागरिकांनी कायदेशिर तरतुद, नियम, अलिखित संकेत यांचे पालन करावे.

ई) नागरिकांनी सार्वजनिक हीत, एकात्मता व अखंडता जोपासण्यासाठी सहकार्याची भावना ठेवावी.

## (३) मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी कार्यालयाची रचना

हे कार्यालय दिनांक ०१/०७/१९६८ पासून कार्यरत आहे. अधीक्षक अभियंता, मुंबई बांधकाम मंडळ, चेंबूर अंतर्गत सन १९८५ पासून मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी हे विभागीय कार्यालय अंधेरी, मुंबई-५८ येथे कार्यरत आहे.

या विभागांतर्गत १) बुमजली इमारती बांधकाम उप विभाग क.३ कलानगर, बांद्रा, २) मुंबई रस्ते बांधकाम उप विभाग क्र.१०, अंधेरी, ३) मार्ग विकास उप विभाग क्र.१०, सांताक्रुझ, ४) मार्ग विकास उप विभाग क्र.१२, अंधेरी, ५) ठाणे खाडी पूल उप विभाग क्र.१, कलानगर, बांद्रा असे उप विभाग येत असून त्यांचेकडे पश्चिम द्रुतगती मार्ग क्र.६ ची देखभाल व दुरुस्तीची कामे व रस्त्याचा संभाग विकसित करणे हे कार्यक्षेत्र येतात.

कार्यकारी अभियंता यांचे अधिपत्याखाली ५ उप विभाग कार्यरत आहेत. मुख्यालये दर्शविणारा तक्ता (Tree Chart) परिशिष्ट "अ" व कार्यकारी अभियंता यांचे क्षेत्राचा नकाशा परिशिष्ट "ब" म्हणून जोडला आहे.

हया विभागांतर्गत कामांच्या अंमलबजावणीसाठी सा.बां. नियमावली, १९६४, लेखा संहिता,१९८४, विनिर्देश, निर्गमित केलेले शासन निर्णय, परिपत्रके इत्यादीचे काटेकोरपणे पालन क्षेत्रिय अधिका-यांकडून केले जाते.

## (४) विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र

हया विभागीय कार्यालयाचे कार्यक्षेत्र मुंबई उपनगरे आहे. या विभागांतर्गत पश्चिम द्रुतगती मार्ग क्र.६ ची देखभाल व दुरुस्ती तसेच आवश्यक व मंजूर मुळ स्वरुपाची कामे करणे.

## ५) विभागाअंतर्गत कार्यपूर्तीचे वेळापत्रक, माहितीची सुलभता

### अ) कार्यपूर्तीचे वेळापत्रक :-

मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई या कार्यालयाच्या कार्यकक्षेतील विविध ना-हरकत प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी लागणारा कालावधी, त्यास सक्षम अधिकारी इत्यादींची माहिती, तसेच रस्ते व पूल आणि इतर कामांविषयीची माहिती कार्यपूर्तीचे वेळापत्रकात (परिशिष्ट " क ") नमुद केली आहे.

अर्जाचा विहित नमुना व जोडावयाची आवश्यक कागदपत्रे यांची माहिती विहित फी भरुन संबंधित विभागीय कार्यालयात मिळू शकते.

नैसर्गिक आपत्ती, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इत्यादी उदभवल्यास या वेळापत्रकातील कार्यपूर्तीच्या कालावधीत वाढ होऊ शकते.

### ब) माहितीची सुलभता :-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या संकेत स्थळावरुन तसेच वेळोवेळी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकाव्दारे जनतेला आकडेवारीचा तपशिल सुलभतेने उपलब्ध होईल.

## ६) विभागीय क्षेत्रातील रस्ते सुरक्षितता

सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्याची सुरक्षितता वाढविण्यासाठी अपघात निवारण समिती स्थापन केली आहे. ही समिती प्रत्यक्ष पाहणी करुन अपघातप्रवण स्थळ शोधून अशा स्थळांची सुधारणा करण्यासाठी उपाययोजना सुचविते.

या विभागाअंतर्गत असलेल्या पश्चिम द्रुतगती मार्ग क्र.६ ची वाहतुक व सुरक्षिततेच्या दृष्टीने वेळोवेळी देखभाल व दुरुस्ती केली जाते. जेणेकरुन द्रुतगती मार्गावरील वाहतुकीस सर्वांना सुरक्षित ठेवण्याचा मानस आहे.

## ७) गा-हाण्याचे निराकरण सनदेचा आढावा व जनसामान्याच्या सुचना.

### अ) गा-हाणी / तक्रारी यांचे निराकरण

विभागाबाबत अथवा कामाबाबत तक्रारी असतील तर त्यासाठी नागरिकांनी ज्या विशिष्ट कार्यालया विरुध्द गा-हाणे / तक्रारी असतील त्या कार्यालयाच्या वरिष्ठ कार्यालयट कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास विभागीय कार्यालय प्रमुखाकडे म्हणजे कार्यकारी अभियंता यांचेकडे गा-हाणे मांडावे / तक्रार नोंदवावी. विभाग कार्यालयाविरुध्द गा-हाणे / तक्रारी असल्यास मंडळ कार्यालयाच्या अधीक्षक अभियंता कार्यालयाकडे गा-हाणे / तक्रार नोंदवावी. अशा गा-हाणी / तक्रारी निवारण या कार्यालयाकडून ७ दिवसांत करण्यात येईल. गा-हाणी / तक्रारी नोंदविण्यासाठी प्रत्येक कार्यालयात स्वतंत्र तक्रारपेटी ठेवण्यात येत आहे. गा-हाणी समक्ष भेट / पत्राने वा "ई-मेलव्दारे" नागरिक मांडू शकतात.

### ब) नागरिकांच्या सनदेचा आढावा / सिंहावलोकन

हया विभागाच्या नागरिकांच्या सनदेच्या उपयुक्ततेबाबतचा तथा परिणामकारकतेचा आढावा मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी, मुंबई अंतर्गत घेण्यात येईल व त्याचा अहवाल प्रसिध्द करण्यांत येईल.

### क) जन सामान्यांकडून सुचना

हया विभागाची ही नागरिकांची सनद सर्व सामान्य नागरिकांच्या छाननीसाठी नेहमीच खुली असेल व सन्माननीय नागरिकांच्या बहुमुल्य सुचनांचा गांभियपुर्वक विचार करुन त्यात केलेली सुधारणा घडवून आणता येईल. ही नागरिकांची सनद स्वतःहून काही नविन कायदेशिर हक्क निर्माण करीत नाही. ती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा उपभोगणा-या नागरिकांना जादा हक्क मांडण्यासाठी मदत करते.

## ८) नागरिकांच्या सनदेची अंमलबज़ावणी

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हया विभागाच्या नागरिकांच्या सनदेची अंमलबजावणी दि.०१ मे, २००९ पासून करण्यास विभाग कटिबध्द आहे.

सनदेस व्यापक प्रसिध्दी देऊन नागरिकांच्या प्रतिक्रिया / अभिप्राय मागविण्यात येतील व त्यांच्या सुचनांचा आदर करुन आवश्यक बदल करण्यांत येईल, नागरिकांना सौजन्यपुर्ण व मदत करण्याच्या भावनेने वर्तणूक मिळेल, भ्रष्टाचारास आळा घालण्यात येईल, तसेच नागरिकांच्या गा-हाण्याचे निराकरण करण्यांत येईल.

## ९) परिशिष्टे :-


अ) मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता. (Tree Chart)

ब) कार्यक्षेत्राचा नकाशा


क) कार्यपूर्तीचे वेळापत्रक

परिशिष्ट – "अ"

मुख्यालय दर्शविणारा वृक्ष तक्ता (Tree Chart)



# दर्शक नकाशा




**NOTES:-**

1. WESTERN EXPRESS HIGHWAY SHOWN THUS.....
2. FLY OVER BRIDGES SHOWN THUS.....
3. UNDERPASS / SUBWAY SHOWN THUS.....

मार्ग विकास विभाग क्र.४, अंधेरी.

- विभागीय कार्यालय असे दर्शविले आहे.........
- उप विभागीय कार्यालय असे दर्शविले आहे.
- अंतर्गत रस्ते असे दर्शविले आहे ...........

**WESTERN EXPRESSWAY No.6**

**FROM BANDRA (Km. 527 / 680) TO DAHISAR CHECK NAKA (Km.**

**TOTAL LENGTH 25.33Kms.**

# परिशिष्ट "क"

## कार्यपूर्तीचे वेळापत्रक

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| १. | रस्त्याकडेला असलेल्या इमारतींना ना-हरकत परवाना | कार्यकारी अभियंता | ३० दिवस |
| २. | पेट्रोल पंप व पेट्रोल पंपाच्या पोहोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| ३. | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी व रस्त्याच्या बाजूला टाकण्यात येणा-या वाहिन्यांबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देणे. | शासन / मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे |
| ४. | रस्त्याच्या बाजुला जाहिरात फलक लावणेबाबत ना-हरकत प्रमाणपत्र देणे | शासन | १५ दिवसात वरिष्ठ कार्यालयास सादर करणे. |
| ५. | रस्ता ओलांडून जाणा-या वाहिन्यांसाठी व रस्त्याच्या बाजूला टाकण्यात येणा-या वाहिन्यांचे रास्त भाडे / प्रमाण भाडे | कार्यकारी अभियंता | १५ दिवस |

| अ.क्र. | कार्यसूची | कार्यवाही करणारा सक्षम अधिकारी | कार्यपूर्तीचा कालावधी मर्यादा |
|---|---|---|---|
| ६. | अंदाजपत्रक्र तयार करणे. | कार्यकारी अभियंता/ उप अभियंता | १५ दिवस |
| ७. | अंदाजपत्रकांना मंजुरी देणे. | मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता | वित्तिय अधिकारानुसार सक्षम अधिकारी मान्यता १५ ते ६० दिवस |
| ८. | निविदा बोलाविणे व निविदा निश्चित करणे. | मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता | वित्तिय अधिकारानुसार सक्षम अधिकारी मान्यता १५ ते ६० दिवस |
| ९. | कंत्राटदारांची देयके अदा करणे. | कार्यकारी अभियंता | कामे प्रगती पथावर असतांना / पुर्ण झाल्यानंतर उपलब्ध अनुदानानुसार देयके अदा करणे. |

Visit us on www.mahapwd.com
e-mail: eerd4andheri.eemum@mahapwd.com